# विद्या भारती विदर्भ

## भूमिका

विद्या भारती अखिल भारतीय शिक्षा संस्थान संपूर्ण भारतात शिक्षण क्षेत्रात कार्य करणारे अग्रगण्य संघटन आहे व देशभरातील सर्व राज्यांमधील प्रांत समितींच्या माध्यमाने शहरी व ग्रामीण क्षेत्रात जवळजवळ 13000 औपचारिक विद्यालये आणि सेवा वस्ती तसेच दूरस्थ, पहाडी क्षेत्र, जनजातीय व तटवर्ती क्षेत्रात सुमारे 11000 संस्कार केन्द्र व एकल विद्यालये अनौपचारिक विद्यालये म्हणून संचालित करीत आहे. भारतीय ज्ञान परंपरेच्या प्रकाशात गुणवत्तापूर्ण शिक्षण देण्यांचा प्रयत्न भारतभर सतत सुरू आहे.

'विद्या भारती विदर्भ' संस्था विद्या भारती अखिल भारतीय शिक्षा संस्थानशी संलग्नित असलेली प्रांत समिती आहे. ही समिती पश्चिम क्षेत्रात गत 19 वर्षांपासून शैक्षणिक क्षेत्रात कार्य करीत आहे. वर्तमान परिस्थिती पहाता विद्या भारती विदर्भशी संपर्कित विद्यालयांच्या संलग्नतेबाबत नवीन नियमावली तयार करण्याची आवश्यकता भासत होती. त्यानुसार विद्या भारती विदर्भ कडून शैक्षणिक सहाय्य संलग्नित संस्था/ विद्यालयांना दिले जाणार आहे. ते असे –

## विद्या भारती विदर्भ कडून देण्यात येणारे शैक्षणिक सहाय्य

1) शैक्षणिक गुणवत्ता वाढीसाठी वेळोवेळी आयोजित केल्या जाणाऱ्या प्रशिक्षण वर्ग (जसे – संस्था संचालक वर्ग, आचार्य प्रशिक्षण वर्ग, आधारभूत विषयांचे प्रशिक्षण वर्ग, वैदिक गणित प्रशिक्षण वर्ग इ.), सम्मेलने, कार्यशाळा इ. शैक्षिक व संघटनात्मक आयोजनांमध्ये समिती/विद्यालयांना किंवा त्यांच्या प्रतिनिधींना विद्या भारती आमंत्रित करेल.

2) संस्था/विद्यालयांनी विविध विषयांवर प्रशिक्षणाची मागणी केली असता तज्ज्ञ मार्गदर्शकांकडून प्रशिक्षणाचे आयोजन विद्या भारती विदर्भ करेल.

3) संघटनेच्या अखिल भारतीय स्वरूपात संलग्नित संस्था/विद्यालयाला जोडण्यासाठी व शैक्षणिक मदत करण्यासाठी संलग्नित संस्थेचा एक प्रतिनिधी विद्या भारती विदर्भच्या साधारण सभेचा निमंत्रित सदस्य राहील. त्याला मतदानाचा अधिकार राहणार नाही.

4) विद्या भारतीचा आणि संस्थेचा परस्पर दृढ परिचय व्हावा म्हणून विद्या भारती विदर्भ संलग्न संस्था/ विद्यालयाला वर्षातून 3 उपक्रम देईल आणि त्याच्या आयोजनात सहाय्य करेल.

5) विद्या भारतीची SGFIशी ( School Games Federation of India) संलग्नता असल्यामुळे विद्या भारतीशी संलग्नित विद्यालयाचे विद्यार्थी विद्या भारतीच्या खेलकूद स्पर्धांमध्ये सहभागी होऊ शकतील ज्यामुळे गुणवान विद्यार्थ्यांना SGFIच्या स्पर्धांमध्ये सहजच सहभागी होता येणार आहे. तसेच विद्यार्थ्यांना अखिल भारतीय स्तरावर होणाऱ्या गणित विज्ञान मेळावा व संस्कृती महोत्सवात सहभागी होता येणार आहे.

6) संस्था/विद्यालय विकासाच्या दृष्टीने आवश्यक मार्गदर्शन विद्या भारती विदर्भ करेल.

आपणांस विनंती आहे की आपली संस्था/विद्यालय/शिशुवाटिका अखिल भारतीय स्तरावरून होणाऱ्या शैक्षणिक परिवर्तनाच्या प्रयत्नात सहभागी करण्यासाठी विद्या भारती विदर्भशी संलग्नित करण्यांचा विचार अवश्य करावा.

# संस्थेच्या संलग्नतेबाबत नियमावली

विद्या भारती विदर्भच्या कार्यकारिणी सभेत दि. 3 जुलै 2022ला झालेल्या निर्णयानुसार संस्थांच्या संलग्नतेसाठी नियमावलीचा स्वीकार करण्यात आला ती खालील प्रमाणे आहे:–

या नियमावलीमध्ये **'विद्या भारती विदर्भ'** पंजिकृत संस्थेचा उल्लेख **'प्रांत समिती'** असा करण्यांत येईल. तसेच **'संस्था'** याचा अर्थ संलग्नतेसाठी आवेदन करणारी **संस्था/न्यास/परिषद/समिती** इ. असेल. त्याच प्रकारे जिथे **'मंत्री'** शब्दाचा उल्लेख असेल त्याचा अर्थ **मंत्री/सचिव/कार्यवाह अथवा अन्य कोणीही समकक्ष पदाधिकारी** असेल.

1) प्रांत समितीशी संलग्नतेसाठी **नव्याने निर्माण होणाऱ्या** संस्थांच्या घटनेत **'संस्था' 'प्रांत समितीशी'** कायम संलग्नित राहील व **'प्रांत समिती'**च्या सर्व नियमांचे आणि वेळोवेळी मिळणाऱ्या सूचनांचे पालन करेल असे लिहणे आवश्यक राहील. तसेच **प्रांत समितीशी पूर्वीपासून संलग्नित असणाऱ्या** अथवा भविष्यात नव्याने संलग्नित होणाऱ्या सर्व संस्थांना आपल्या कार्यकारिणी सभा / सर्वसाधारण सभेत या आशयाचा एक ठराव करणे आवश्यक राहील की ती संस्था **'प्रांत समिती'**शी संलग्नता घेऊ इच्छित आहे व **'प्रांत समिती'**च्या सर्व नियमांचे व वेळोवेळी मिळणाऱ्या सूचनांचे पालन संस्था करेल. संलग्नतेसाठी निर्धारित प्रारूपात आवेदन प्रांत समितीच्या मंत्र्यांकडे करावे लागेल व त्याच्यासोबत संस्थेच्या ठरावाची स्वयंप्रमाणित छायाप्रत (Photo Copy) देणे आवश्यक असेल. 'प्रांत समिती'नी मान्यता दिल्यावर संस्था संलग्नता शुल्क रू. 3000/– (रू. तीन हजार केवळ) एकरकमी चेकद्वारे / Online प्रांत समितीच्या कार्यालयाला पाठवणे आवश्यक असेल. संस्थेची **संलग्नता 3 (तीन) शैक्षणिक वर्षांकरिता असेल. विद्या भारतीशी संबंधित शुल्क निर्धारण करण्याचे अधिकार प्रांत समितीकडे राहतील.**

2) कोणत्याही संस्थेचे आवेदन पत्र, ठरावाची स्वयंप्रमाणित छायाप्रत प्रांत समितीकडे प्राप्त झाल्यावर प्रांत समितीच्या आगामी कार्यकारिणी मंडळाच्या सभेमध्ये आवेदन पत्रावर विचार करून संलग्नता देण्याबाबत निर्णय घेण्यात येईल व तसे संस्थेला पुढील शुल्क भरण्यांविषयी कळविण्यांत येईल. संस्था संलग्नता शुल्क रू. 3000/– (रू. तीन हजार केवळ) एकरकमी चेकद्वारे/Online प्रांत समितीच्या खात्यात जमा झाल्यावर मंत्री यांच्या स्वाक्षरीने तसे संलग्नता प्रमाणपत्र संबंधित संस्थेकडे दिले जाईल. कार्यकारी मंडळाने मान्यता दिल्यानंतर संलग्नता शुल्क जमा झाल्यापासून संस्थेची **संलग्नता 3 (तीन) शैक्षणिक वर्षांकरिता राहील**.

3) सर्व संस्थांना प्रांत समितीच्या शैक्षिक कार्याच्या उद्देशांच्या पूर्तीसाठी सहकार्य करणे अपेक्षित राहील.

4) 'विद्या भारती विदर्भ'शी संस्था संलग्न आहे असा उल्लेख कार्यालयातील पाटीवर असावा. तसेच संस्थेच्या कार्यालयात विद्या भारतीद्वारा निर्धारित सरस्वती, ॐ व भारतमातेचे छायाचित्र (फोटो) दर्शनी भागात लावणे अपेक्षित आहे.

5) संस्थेचे किमान **एक विद्यालय** संलग्नित असणे आवश्यक आहे. संस्थेद्वारा संचालित विद्यालयाच्या/शिशुवाटिकेच्या संलग्निकरणाबाबत नियमावलीचे पालन करणे आवश्यक राहील. **[विद्यालयाच्या/शिशुवाटिकेच्या संलग्निकरणाबाबत नियमावली पहावी ]**

6) संस्थेचे महाविद्यालय असल्यास 'विद्या भारती उच्च शिक्षा संस्थान'च्या नियमावलीचे पालन करीत त्यांच्या नियमावलीनुसार संलग्नता घेता येईल.

7) 'प्रांत समिती'ने आयोजित केलेल्या विविध कार्यक्रमांना प्राथमिकता देऊन निमंत्रित घटकांची उपस्थिती अपेक्षित राहील.

8) सर्व संलग्नित संस्थांनी व संलग्नित विद्यालयांनी योग्य स्थानी दर्शनी भागात विद्या भारतीचे लक्ष्य लावणे अपेक्षित राहील.

9) संलग्नित संस्थांचे कार्यालय व संस्थेद्वारा संचालित विद्यालयाने वेळोवेळी प्रकाशित केलेल्या साहित्यात विद्या भारतीचे प्रतिक चिन्ह (Logo) प्रमुख स्थानावर प्रकाशित करणे अपेक्षित आहे. तसेच संलग्नित विद्यालयाच्या नावासोबत 'विद्या भारती संलग्नित विद्यालय' असा उल्लेख करणे अपेक्षित आहे.

10) 'प्रांत समिती'द्वारा आयोजित संस्था संचालक, मुख्याध्यापक/प्रधानाचार्य व शिक्षक/आचार्यांच्या बैठकी, कार्यशाळा, प्रशिक्षण वर्ग व अन्य शैक्षिक आणि संघटनात्मक आयोजनांमध्ये संलग्नित संस्थेचा सहभाग अपेक्षित राहील.

11) संलग्नित संस्थेचा वार्षिक शैक्षणिक अहवाल कृपया प्रांत समितीकडे शैक्षणिक वर्षाच्या अखेरीस पाठवणे अपेक्षित राहील.

12) 3 शैक्षणिक वर्षानंतर संस्थेच्या संलग्नतेचे नूतनीकरण त्यावेळच्या नियमावलीनुसार होईल.

# विद्यालय/शिशुवाटिकेच्या संलग्नतेबाबत नियमावली

विद्या भारती विदर्भच्या कार्यकारिणी सभेत दि. 3 जुलै 2022ला झालेल्या निर्णयानुसार विद्यालय/शिशुवाटिकेच्या संलग्नतेसाठी नियमावलीचा स्वीकार करण्यात आला ती खालील प्रमाणे आहे:–

या नियमावलीमध्ये **'विद्या भारती विदर्भ'** या पंजिकृत संस्थेचा उल्लेख **'प्रांत समिती'** असा करण्यांत येईल. तसेच **'विद्यालय'** याचा अर्थ संलग्नतेसाठी आवेदन करणारे **विद्यालय/शिशुवाटिका** असेल. त्याच प्रकारे जिथे **'प्रधानाचार्य'** शब्दाचा उल्लेख असेल त्याचा अर्थ विद्यालयाचा **मुख्याध्यापक अथवा अन्य कोणीही समकक्ष पदाधिकारी** असेल.

1) संलग्नित विद्यालय (शिशुवाटिका सोडून) ज्या संस्थेद्वारे संचालित असेल ती संस्था **'प्रांत समिती'**शी संलग्नित असणे **अनिवार्य नाही.**

2) **ज्या संस्था केवळ स्वतंत्र शिशुवाटिका संचालित करीत आहेत त्या संस्था संलग्न होणे आवश्यक आहे.**

3) संस्थेचे विद्यालय संलग्नित करण्यांसाठी संस्थेला आपल्या कार्यकारी मंडळाच्या सभेत त्या आशयाचा एक ठराव करणे आवश्यक राहील की ते विद्यालय **'प्रांत समिती'**शी संलग्नित करू इच्छित आहे व **'प्रांत समिती'**च्या सर्व नियमांचे व वेळोवेळी मिळणाऱ्या सूचनांचे पालन विद्यालय करेल. विद्यालयाच्या प्रधानाचार्यांनी संस्थेच्या ठरावासह **'प्रांत समिती'**कडून प्राप्त आवेदन पत्राच्या नमुन्यानुसार आवेदन प्रांत समितीकडे सादर करावे. प्रांत समितीनी मान्यता दिल्यावर **अ) विद्यालय संलग्नता शुल्क** रू. 3000/– (रू. तीन हजार केवळ, 3 शैक्षणिक वर्षांसाठी) किंवा **ब) केवळ शिशुवाटिका असणाऱ्या संस्थांना संलग्नता शुल्क** रू. 1500 (रू. एक हजार पाचशे केवळ, 3 शैक्षणिक वर्षांसाठी) तसेच **विद्यार्थी संलग्नता वार्षिक शुल्क** चेकद्वारा/Online भरून प्रांत समितीच्या कार्यालयात निर्धारित वेळात द्यावेत.

**प्रति विद्यार्थी प्रति वर्ष संलग्नता शुल्क –**

| वर्ग | पायाभूत शिक्षण गट (शिशुवाटिका व वर्ग 1 आणि 2 | पूर्वतयारी गट (वर्ग 3 ते 5) | माध्यमिक गट (वर्ग 6 ते 8) | सेकंडरी गट (वर्ग 9 ते 12) |
|---|---|---|---|---|
| शुल्क | रू. 3 (तीन) प्रती विद्यार्थी किंवा रू. 100 पैकी अधिक असेल ते | रू. 5 (पाच) | रू. 7 (सात) | रू. 10 (दहा) |

**विद्या भारतीशी संबंधित शुल्क निर्धारण करण्याचे अधिकार प्रांत समितीकडे राहतील.**

4) विद्यालयाच्या प्रधानाचार्यांकडून आवेदन पत्र प्राप्त झाल्यावर प्रांत समितीच्या कार्यकारी मंडळाच्या सभेत त्यावर विचार करून निर्णय घेण्यात येईल व निर्णय प्रधानाचार्यांना कळविला जाईल. अश्या प्रकारे संलग्नित विद्यालयाची संलग्नता 3 (तीन) शैक्षणिक वर्षांसाठी राहील.

5) सर्व विद्यालयांना प्रांत समितीच्या शैक्षिक कार्यांच्या उद्देशांच्या पूर्तीसाठी सहकार्य करणे अपेक्षित राहील.

6) ही शाळा/ हे विद्यालय **'विद्या भारती विदर्भ'**शी संलग्न आहे असा उल्लेख शाळेच्या / विद्यालयाच्या पाटीवर आसवा. प्रधानाचार्यांच्या कार्यालयात विद्या भारतीद्वारा निर्धारित सरस्वती, ॐ व भारतमातेचे छायाचित्र (फोटो) योग्य स्थानी दर्शनी भागात अवश्य लावावे.

7) संलग्नित विद्यालयाच्या सुयोग्य स्थानी दर्शनी भागात विद्या भारतीचे लक्ष्य अवश्य लावावे.

8) विद्या भारतीची सरस्वती वंदना सर्व विद्यार्थ्यांना कंठस्थ व्हावी असा प्रयत्न करावा. वर्ग 4थी ते 9वी पर्यंतच्या सर्व वयोगटातील सर्व विद्यार्थ्यांकडून विद्या भारतीच्या संस्कृती ज्ञान परीक्षेचे शुल्क प्रति विद्यार्थी रू. 40/– (रूपये चाळीस), वर उल्लेखित विद्यार्थी वार्षिक संलग्नता शुल्क प्रति विद्यार्थी विद्यार्थ्यांच्या प्रवेशाच्यावेळीच घ्यावे व सूचनेनुसार ते प्रांत समितीकडे पाठवावे. **प्रांत व अखिल भारतीय स्तरावरील** विविध स्पर्धाचे सहभागिता शुल्क वेळोवेळी विद्यालयाने भरावे.

9) 'संस्कृती बोध परियोजनेचा' भावार्थ समजून घ्यावा. ही केवळ परीक्षा नव्हे याचे भान ठेऊन विद्यार्थ्यांकडून संस्कृती ज्ञान परीक्षेची पूर्व तयारी करून घ्यावी. वेळापत्रकात त्याकरीता आवश्यक वेळ ठेवावा.

10) विद्या भारतीच्या खेलकूद स्पर्धेत व गणित विज्ञान मेळाव्यात विद्यालयाची सहभागिता अपेक्षित राहील. तसेच **'प्रांत समिती'**नी आयोजित केलेल्या विविध कार्यक्रमांना प्राथमिकता देऊन संलग्नित विद्यालय (शिशुवाटिका शिशुंच्या कार्यक्रमात) सहभागी होणे अपेक्षित राहील.

11) संलग्नित विद्यालयाने वेळोवेळी प्रकाशित केलेल्या साहित्यात विद्या भारतीचे प्रतीक चिन्ह (Logo) प्रमुख स्थानावर प्रकाशित करणे अपेक्षित आहे. तसेच संलग्नित विद्यालयाच्या/शिशुवाटिकेच्या नावासोबत अनुक्रमे 'विद्या भारती संलग्नित विद्यालय'/ 'विद्या भारती संलग्नित शिशुवाटिका' असा उल्लेख करावा.

12) **'प्रांत समिती'**द्वारा आयोजित मुख्याध्यापक/प्रधानाचार्य व शिक्षक/आचार्यांच्या बैठकी, कार्यशाळा, प्रशिक्षण वर्ग व अन्य शैक्षिक आणि संघटनात्मक आयोजनांमध्ये संलग्नित विद्यालयांची सहभागिता अपेक्षित राहील.

13) संलग्नित विद्यालयात झालेल्या कार्यक्रमांचे अहवाल तसेच मुख्याध्यापक पदावरील व्यक्ती बदलले असल्यास त्यांचे नाव व अन्य आवश्यक माहिती **'प्रांत समिती'**कडे अवश्य पाठवावी.

14) 3 शैक्षणिक वर्षांनंतर विद्यालयाचे/शिशुवाटिकेचे संलग्नतेचे नूतनीकरण त्यावेळच्या नियमावलीनुसार होईल

## विद्या भारती विदर्भ कडून देण्यात येणारे शैक्षणिक सहाय्य

1) शैक्षणिक गुणवत्ता वाढीसाठी प्रांत समिती वेळोवेळी आयोजित केल्या जाणाऱ्या प्रशिक्षण वर्ग (जसे – संस्था संचालक वर्ग, आचार्य प्रशिक्षण वर्ग, आधारभूत विषयांचे प्रशिक्षण वर्ग, वैदिक गणित प्रशिक्षण वर्ग इ.), सम्मेलने, कार्यशाळा इ. शैक्षिक व संघटनात्मक आयोजनांमध्ये समिती/विद्यालयांना किंवा त्यांच्या प्रतिनिधींना आमंत्रित करेल.

2) संस्था/विद्यालयांनी विविध विषयांवर प्रशिक्षणाची मागणी केली असता तज्ञ मार्गदर्शकांकडून प्रशिक्षणाचे आयोजन प्रांत समिती करेल.

3) संघटनेच्या अखिल भारतीय स्वरूपात संलग्नित संस्था/विद्यालयाला जोडण्यासाठी व समन्वयातून शैक्षणिक मदत करण्यासाठी प्रांत समितीच्या निर्णयानुसार संलग्नित विद्यालयाचा मुख्याध्यापक प्रांत समितीच्या साधारण सभेचा निमंत्रित सदस्य राहील. त्याला मतदानाचा अधिकार राहणार नाही.

4) विद्या भारतीचा आणि संस्थेचा परस्पर दृढ परिचय व्हावा म्हणून प्रांत समिती संलग्न विद्यालयाला वर्षातून 3 उपक्रम देईल आणि त्याच्या आयोजनात सहाय्य करेल.

5) विद्या भारतीची SGFIशी (School Games Federation of India) संलग्नता असल्यामुळे विद्या भारतीशी संलग्नित विद्यालयाचे विद्यार्थी विद्या भारतीच्या खेलकूद स्पर्धांमध्ये सहभागी होऊ शकतील ज्यामुळे गुणवान विद्यार्थ्यांना SGFIच्या स्पर्धांमध्ये सहजच सहभागी होता येणार आहे. तसेच विद्यार्थ्यांना अखिल भारतीय स्तरावर होणाऱ्या गणित विज्ञान मेळावा व संस्कृती महोत्सवात सहभागी होता येणार आहे.

6) विद्यालय विकासाच्या दृष्टीने आवश्यक मार्गदर्शन प्रांत समिती करेल.

**अनुशासनात्मक कार्यवाही**

जर प्रांत समितीशी संलग्नित संस्था/विद्यालयाने संलग्नतेच्या नियमावलीचा किंवा तत्संबंधित निर्देशांचे पालन केले नाही तर प्रांत समिती अश्या संस्था/विद्यालयाच्या संलग्नतेबाबत विचार करून योग्य निर्णय घेईल.

**स्थळ — नागपूर**
**दि.** 3 जुलै 2022

(सतीश खोत)
मंत्री, विद्या भारती विदर्भ
विद्या भारती विदर्भ